# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

## मध्यवर्ती कार्यालय, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल (पूर्व), मुंबई-४०० ००८

## जाहिरात क्र.०१/२०१७ सरळसेवा भरती पर्यवेक्षकीय पदे.

*********

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील खाली नमुद केल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय पदांकरीता अर्हता पूर्ण करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन (online) पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

<u>उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी सदर जाहिरातीत देण्यात आलेली माहिती, सूचना, अटी व शर्ती इ. काळजीपूर्वक वाचाव्यात.</u>

**(१) <u>भरावयाच्या पदांची सामाजिक व समांतर आरक्षणानुसार संख्या खालील प्रमाणे आहे</u>.**

**(१) सहा.वाहतूक अधिक्षक (कनिष्ठ)** — **गट- अतांत्रिक**
**पद सांकेतांक क्र. ५**

| समांतर आरक्षण गट | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| महिला | | १ | | | | | | १ | ४ | **६** |
| माजी सैनिक | | | | | | | | | २ | **२** |
| प्रकल्पग्रस्त | | | | | | | | | १ | **१** |
| अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू | | | | | | | | | १ | **१** |
| सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेतर्गंत शासन सेवेमध्ये काम केलेले अंशकालीन कर्मचारी | | | | | | | | | १ | **१** |
| इतर | १ | २ | १ | १ | १ | १ | १ | २ | ४ | **१४** |
| भरावयाच्या एकूण जागा | **१** | **३** | **१** | **१** | **१** | **१** | **१** | **३** | **१३** | **२५** |

**(२) वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ)** — **गट- अतांत्रिक**
**पद सांकेतांक क्र. ६**

| समांतर आरक्षण गट | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| महिला | ५ | ४ | १ | १ | २ | १ | १ | ९ | २१ | **४५** |
| माजी सैनिक | २ | २ | १ | | १ | | १ | ५ | ११ | **२३** |
| प्रकल्पग्रस्त | १ | १ | | | | | | २ | ४ | **८** |
| भूकंपग्रस्त | | | | | | | | १ | १ | **२** |
| अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू | १ | १ | | | | | | २ | ४ | **८** |
| सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेतर्गंत शासन सेवेमध्ये काम केलेले अंशकालीन कर्मचारी | २ | १ | | | १ | | | ३ | ७ | **१४** |
| इतर | ५ | ३ | २ | १ | २ | १ | २ | ९ | २३ | **४८** |
| भरावयाच्या एकूण जागा | **१६** | **१२** | **४** | **२** | **६** | **२** | **४** | **३१** | **७१** | **१४८** |

२/---

**(३) लेखाकार (कनिष्ठ)** **गट- अतांत्रिक**

**पद सांकेतांक क्र. ७**

| समांतर आरक्षण गट | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| महिला | ३ | १ | १ | | | | | ४ | १० | **१९** |
| माजी सैनिक | १ | | | | | | | २ | ५ | **८** |
| प्रकल्पग्रस्त | | | | | | | | १ | २ | **३** |
| भूकंपग्रस्त | | | | | | | | | १ | **१** |
| अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू | | | | | | | | १ | २ | **३** |
| सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेतर्गंत शासन सेवेमध्ये काम केलेले अंशकालीन कर्मचारी | १ | | | | | | | १ | ३ | **५** |
| इतर | ४ | १ | २ | १ | १ | | | ६ | ९ | **२४** |
| भरावयाच्या एकूण जागा | **९** | **२** | **३** | **१** | **१** | | | **१५** | **३२** | **६३** |

**(४) भांडार पर्यवेक्षक (कनिष्ठ)** **गट- अतांत्रिक**

**पद सांकेतांक क्र.८**

| समांतर आरक्षण गट | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| महिला | | | | | | | | | १ | **१** |
| इतर | | | | | | | | | १ | **१** |
| भरावयाच्या एकूण जागा | | | | | | | | | **२** | **२** |

**(५) भांडारपाल (कनिष्ठ)** **गट- अतांत्रिक**

**पद सांकेतांक क्र.९**

| समांतर आरक्षण गट | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| महिला | १ | १ | | | १ | | | ३ | ५ | **११** |
| माजी सैनिक | | | | | | | | १ | ३ | **४** |
| प्रकल्पग्रस्त | | | | | | | | १ | १ | **२** |
| अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू | | | | | | | | | १ | **१** |
| सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेतर्गंत शासन सेवेमध्ये काम केलेले अंशकालीन कर्मचारी | | | | | | | | १ | २ | **३** |
| इतर | २ | २ | १ | १ | १ | १ | १ | ४ | ६ | **१९** |
| भरावयाच्या एकूण जागा | **३** | **३** | **१** | **१** | **२** | **१** | **१** | **१०** | **१८** | **४०** |

टिप :- उपरोक्त पदांपैकी १ पद मुक व कर्णबधीर - (HH) या अपंग प्रवर्गासाठी राखीव आहे.

**(६) सुरक्षा निरीक्षक (कनिष्ठ)** **गट- अतांत्रिक**

**पद सांकेतांक क्र.१०**

| समांतर आरक्षण गट | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| महिला | १ | | | | | | | १ | २ | **४** |
| माजी सैनिक | | | | | | | | | १ | **१** |
| सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेतर्गंत शासन सेवेमध्ये काम केलेले अंशकालीन कर्मचारी | | | | | | | | | १ | **१** |
| इतर | १ | | १ | १ | | | | १ | २ | **६** |
| भरावयाच्या एकूण जागा | **२** | | **१** | **१** | | | | **२** | **६** | **१२** |

३/---

**(७) सहा.सुरक्षा निरीक्षक (कनिष्ठ)** **गट- अतांत्रिक**

**पद सांकेतांक क्र.११**

| समांतर आरक्षण गट | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| महिला | १ | | | | | | | २ | ३ | **६** |
| माजी सैनिक | १ | | | | | | | १ | २ | **४** |
| प्रकल्पग्रस्त | | | | | | | | | १ | **१** |
| अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू | | | | | | | | | १ | **१** |
| सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेतर्गंत शासन सेवेमध्ये काम केलेले अंशकालीन कर्मचारी | | | | | | | | १ | १ | **२** |
| इतर | २ | १ | | | | | | २ | ३ | **८** |
| भरावयाच्या एकूण जागा | **४** | **१** | | | | | | **६** | **११** | **२२** |

**(८) आगरक्षक (कनिष्ठ)** **गट- अतांत्रिक**

**पद सांकेतांक क्र.१२**

| | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| भरावयाच्या एकूण जागा | | | | | | | | | १ | १ |

**(९) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (कनिष्ठ)** **गट- तांत्रिक**

**पद सांकेतांक क्र.१३**

| समांतर आरक्षण गट | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| महिला | १ | १ | | | | | | ३ | ९ | **१४** |
| माजी सैनिक | १ | | | | | | | १ | ४ | **६** |
| प्रकल्पग्रस्त | | | | | | | | | १ | **१** |
| भूकंपग्रस्त | | | | | | | | | १ | **१** |
| अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू | | | | | | | | | १ | **१** |
| सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेतर्गंत शासन सेवेमध्ये काम केलेले अंशकालीन कर्मचारी | | | | | | | | १ | ३ | **४** |
| इतर | २ | १ | १ | १ | | | | ४ | १० | **१९** |
| भरावयाच्या एकूण जागा | **४** | **२** | **१** | **१** | | | | **९** | **२९** | **४६** |

टिप :- उपरोक्त पदांपैकी २ पदे अस्थिव्यंग/लोकोमोटीव्ह सेरेब्रल पाल्सी (OA,OL) या अपंग प्रवर्गासाठी राखीव आहेत.

**(१०) कनिष्ठ अभियंता (विद्युत) (कनिष्ठ)** **गट- तांत्रिक**

**पद सांकेतांक क्र.१४**

| समांतर आरक्षण गट | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| महिला | | | | | | | | | १ | **१** |
| माजी सैनिक | | | | | | | | | १ | **१** |
| सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेतर्गंत शासन सेवेमध्ये काम केलेले अंशकालीन कर्मचारी | | | | | | | | | १ | **१** |
| इतर | १ | | | १ | | | | | २ | **४** |
| भरावयाच्या एकूण जागा | **१** | | | **१** | | | | | **५** | **७** |

४/---

**(११) सहा.कार्य.अधिक्षक (कनिष्ठ)/ तांत्रिक सहाय्यक (कनिष्ठ) गट- तांत्रिक**
**पद सांकेतांक क्र.१५**

| समांतर आरक्षण गट | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| महिला | ३ | ३ | १ | १ | १ | १ | | २ | १५ | **२७** |
| माजी सैनिक | २ | १ | | | १ | | | १ | ७ | **१२** |
| प्रकल्पग्रस्त | १ | १ | | | | | | | २ | **४** |
| भूकंपग्रस्त | | | | | | | | | १ | **१** |
| अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू | १ | १ | | | | | | | २ | **४** |
| सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेतर्गंत शासन सेवेमध्ये काम केलेले अंशकालीन कर्मचारी | १ | १ | | | | | | १ | ५ | **८** |
| इतर | ३ | ३ | २ | २ | २ | २ | १ | ४ | १७ | **३६** |
| भरावयाच्या एकूण जागा | **११** | **१०** | **३** | **३** | **४** | **३** | **१** | **८** | **४९** | **९२** |

**(१२) प्रभारक (कनिष्ठ) गट- तांत्रिक**
**पद सांकेतांक क्र.१६**

| समांतर आरक्षण गट | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| महिला | १ | | १ | | | | | १ | १ | **४** |
| इतर | १ | १ | १ | | १ | | | १ | १ | **६** |
| भरावयाच्या एकूण जागा | **२** | **१** | **२** | | **१** | | | **२** | **२** | **१०** |

**(१३) वरिष्ठ संगणित्र चालक (कनिष्ठ)/ गट- तांत्रिक**
**विभागीय संगणक पर्यवेक्षक (क.) पद सांकेतांक क्र.१८**

| समांतर आरक्षण गट | अनु जात | अनु जमात | वि.जा. व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| महिला | १ | | | | | | | १ | २ | **४** |
| माजी सैनिक | | | | | | | | | १ | **१** |
| सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेतर्गंत शासन सेवेमध्ये काम केलेले अंशकालीन कर्मचारी | | | | | | | | | १ | **१** |
| इतर | १ | १ | १ | | १ | | | २ | ३ | **९** |
| भरावयाच्या एकूण जागा | **२** | **१** | **१** | | **१** | | | **३** | **७** | **१५** |

१) शासन निर्णय क्र.विकाक.२२१५/प्र.क्र.३३७/१६-ब, दिनांक ०४.११.२०१६ नुसार समांतर आरक्षणापैकी भूकंपग्रस्तांसाठी आरक्षित जागेवर उमेदवार उपलब्ध न झाल्यास या जागांसाठी प्रकल्पग्रस्त उमेदवारांचा विचार करण्यात येईल. प्रकल्पग्रस्त उमेदवारही उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या-त्या सामाजिक आरक्षणातील इतर उमेदवारांमधून भरण्यात येतील.

२) उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे इतर उमेदवारांमधुन भरण्यात येतील तसेच समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातुन भरण्यात येते.

३) भरतीबाबतची सर्व कार्यपध्दती, आवश्यक माहिती, अटी व शर्तींची माहिती महामंडळाच्या www.msrtcexam.in व www.msrtc.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीसाठी उपलब्ध आहे. ती विचारात घेऊन उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.

**(३) <u>शैक्षणिक अर्हता, शारीरिक पात्रता, अनुभव,वेतनश्रेणी, इतर अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे</u>.**

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, इतर अटी व शर्ती |
|---|---|---|
| १ | <u>सहाय्यक वाहतूक अधिक्षक (कनिष्ठ)</u><br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु.७६६०-२५०२० | १)मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) वाहतूक क्षेत्रातील कामाचा २ वर्षाचा अनुभव (रा.प. कर्मचा -यांसाठी केवळ सहा.वाह.निरिक्षक /वाहतूक निरिक्षक व वरिष्ठ कारकून, पदातील वाहतूक खाते / शाखेच्या कामाचा २ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३)उमेदवार''एम.एस.सी.आय.टी.'' /तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा.<br>४)शारिरीक पात्रता :<br>ऊंची -१६३ सें.मी. (किमान )<br>(महिला उमेदवारांसाठी ऊंची १५३ सें.मी.)<br>५)अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचा परवानाधारक असावा किंवा रा.प.मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक. |
| २ | <u>वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ)</u><br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु.६७९०-२२१९१ | १)मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक.<br>२)वाहतूक क्षेत्रातील कामाचा १ वर्षाचा अनुभव (रा.प. कर्मचा-यांसाठी केवळ सहा.वाह.निरिक्षक /वाहतूक नियंत्रक व वरिष्ठ कारकून, पदातील वाहतूक खाते/शाखेच्या कामाचा १ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३)उमेदवार''एम.एस.सी.आय.टी.''/ तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा.<br>४)शारिरीक पात्रता :<br>ऊंची -१६३सें.मी.(किमान )<br>(महिला उमेदवारांसाठी ऊंची १५३ सें.मी.)<br>५)अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचा परवानाधारक असावा किंवा रा.प.मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक. |
| ३ | <u>लेखाकार (कनिष्ठ) / कनिष्ठ संग्रह पडताळक (कनिष्ठ)</u><br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु. ६७९०-२२१९१ | १)मान्यताप्राप्त विद्यापिठाचा "बी.कॉम" पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) लेखापाल कामाचा १ वर्षाचा अनुभव (रा.प.कर्मचा-यांसाठी वरिष्ठ लिपिक पदातील लेखा खात्यातील कामाचा १ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) उमेदवार ''एम.एस.सी.आय.टी.''/ तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा. |

६/---

| | | |
|---|---|---|
| ४ | भांडार पर्यवेक्षक (कनिष्ठ) / वरिष्ठ संग्रह पडताळक (कनिष्ठ)<br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता<br>(कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.७६६०-२५०२० | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा वाणिज्य वा विज्ञान शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक.<br>किंवा<br>ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका.(तीन वर्षे मुदतीची ) असणे आवश्यक.<br>२) मोटारीचे सुटे भाग इ. भांडार सामान हाताळणे व त्याच्या नोंदी ठेवणे व खरेदी करण्याबाबतचा २ वर्षांचा व्यावहारिक अनुभव.<br>(रा.प.कर्मचा-यांसाठी वरिष्ठ लिपिक पदातील भांडार खात्यातील कामाचा २ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) उमेदवार ''एम.एस.सी.आय.टी.''/ तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा. |
| ५ | भांडारपाल (कनिष्ठ)<br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता<br>(कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.६७९०-२२१९१ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा वाणिज्य वा विज्ञान शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक.<br>किंवा<br>ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका. (३वर्षे मुदतीची) असणे आवश्यक.<br>२) मोटारीचे सुटे भाग इ. भांडार सामान हाताळणे व त्याच्या नोंदी ठेवणे व खरेदी करण्याबाबतचा १ वर्षांचा व्यावहारिक अनुभव. (रा.प.कर्मचा-यांसाठी कनिष्ठ लिपिक पदातील भांडार खात्यातील कामाचा १ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) उमेदवार ''एम.एस.सी.आय.टी.'' / तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा. |
| ६ | सुरक्षा निरीक्षक (कनिष्ठ)<br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता<br>(कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.६७९०-२२१९१ | १)मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेतील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२)उमेदवार "एमएससी-आयटी"(MS-CIT) / तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा.<br>३)शारिरीक पात्रता ऊंची १६५ से.मी.(महिला उमेदवारांसाठी ऊंची १५५ से.मी.)छाती ७८ सें.मी.न फुगविता (पुरुष उमेदवारांसाठी)<br>४)शारिरीक क्षमतेची चाचणी.<br>(१) ५ मिनिटात १ कि.मी. धावणे. (महिलांसाठी १ मिनिटात २०० मी. धावणे.)<br>(२) जमीनीशी समांतर बारला छाती टेकेल अशारितीने सिंगल बारवर पुलअप्स काढणे.(फक्त पुरुष उमेदवारांसाठी )<br>(३) सर्व अवयवांचा समन्वय साधून दोन्ही बाजुला एक-एक पाय टाकून (ॲस्ट्राइड ) १० उडया मारणे. (फक्त पुरुष उमेदवारांसाठी ) |

७/----

| | | |
|---|---|---|
| ७ | <u>सहाय्यक सुरक्षा निरीक्षक (कनिष्ठ)</u><br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४०५०-४४२७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.५०५०-१६६११ | १)मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेतील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२)उमेदवार "एमएससी-आयटी"(MS-CIT) / तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा.<br>३)शारिरीक पात्रता ऊंची १६५ से.मी.(महिला उमेदवारांसाठी ऊंची १५५ से.मी.) छाती ७८ सें.मी.न फुगविता (पुरुष उमेदवारांसाठी)<br>४)<u>शारिरीक क्षमतेची चाचणी</u>.<br>(१) ५ मिनिटात १ कि.मी. धावणे. (महिलांसाठी १ मिनिटात २०० मी. धावणे.)<br>(२) जमीनीशी समांतर बारला छाती टेकेल अशारितीने सिंगल बारवर पुलअप्स काढणे.(फक्त पुरुष उमेदवारांसाठी )<br>(३) सर्व अवयवांचा समन्वय साधून दोन्ही बाजुला एक-एक पाय टाकून (ॲस्ट्राइड ) १० उडया मारणे. (फक्त पुरुष उमेदवारांसाठी ) |
| ८ | <u>आगरक्षक (कनिष्ठ)</u><br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.६७९०-२२१९१ | १)मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेतील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२)मान्यताप्राप्त शासकीय संस्थेची अग्नीशमनाची पदवीका आवश्यक.<br>किंवा<br>''२'' मधील अर्हतेशी समकक्ष सेनादलाची अर्हता ग्राहय राहील.<br>३) <u>शारिरीक पात्रता</u> :- ऊंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी ऊंची १५५ से.मी.) छाती ७८ सें.मी.न फुगविता (पुरुष उमेदवारांसाठी )<br>४)<u>शारिरीक क्षमतेची चाचणी</u>.<br>(१) ५ मिनिटात १ कि.मी. धावणे. (महिलांसाठी १ मिनिटात २०० मी. धावणे.)<br>(२) जमीनीशी समांतर बारला छाती टेकेल अशारितीने सिंगल बारवर पुलअप्स काढणे.(फक्त पुरुष उमेदवारांसाठी )<br>(३) सर्व अवयवांचा समन्वय साधून दोन्ही बाजुला एक-एक पाय टाकून (ॲस्ट्राइड ) १० उडया मारणे. (फक्त पुरुष उमेदवारांसाठी ) |
| ९ | <u>कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) (कनिष्ठ)</u><br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४६००-५०२८<br>* (पदविकाधारकास ३ व पदवीधारकास ५ आगाऊ वेतनवाढी देण्यात येतील.)<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.७६६०-२५०२० | १) स्थापत्य अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका (३ वर्षे मुदतीची) असणे आवश्यक. |

८/----

| | | |
|---|---|---|
| १० | <u>कनिष्ठ अभियंता (विद्युत) (कनिष्ठ)</u><br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४६००-५०२८<br>* (पदविकाधारकास ३ व पदवीधारकास ५ आगाऊ वेतनवाढी देण्यात येतील.)<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु. ७६६०-२५०२० | १)विद्युत अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका (३ वर्षे मुदतीची) असणे आवश्यक. |
| ११ | <u>सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक (कनिष्ठ)/ तांत्रिक सहाय्यक (कनिष्ठ)</u><br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४६००-५०२८<br>* (पदविकाधारकास ३ व पदवीधारकास ५ आगाऊ वेतनवाढी देण्यात येतील.)<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.७६६०-२५०२० | १) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका. (३ वर्षे मुदतीची ) असणे आवश्यक.<br>२) मोटार दुरुस्ती कार्यशाळेतील कामाचा १ वर्षाचा अनुभव.<br>(रा. प. कर्मचा-यांसाठी रा.प.कार्यशाळा/आगार कार्यशाळेतील कामाचा १ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३)अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचा परवानाधारक असावा किंवा रा.प. मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक. |
| १२ | प्रभारक <u>(कनिष्ठ)</u><br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४१६०-४५४७<br>* (पदविकाधारकास ३ व पदवीधारकास ५ आगाऊ वेतनवाढी देण्यात येतील.)<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु. ६७९०-२२१९१ | १)ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका. (तीन वर्षे मुदतीची ) असणे आवश्यक.<br>२) मोटार दुरुस्ती कार्यशाळेतील कामाचा १ वर्षाचा अनुभव. (रा.प.कर्मचा-यांसाठी रा.प.कार्यशाळा / आगार कार्यशाळेतील कामाचा १ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचा परवानाधारक असावा किंवा रा.प. मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक. |
| १३ | <u>वरिष्ठ संगणित्र चालक (कनिष्ठ)</u><br>अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ) वेतनश्रेणी.<br>रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.६७९०-२२१९१ | १) "मान्यताप्राप्त विद्यापिठाचा संगणकीय / माहिती व तंत्रज्ञान विषयातील पदवीधारक / समकक्ष पदवीधारक अथवा समकक्ष अर्हतेपेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारक."<br><br>**टिप :- स्वतंत्रपणे, पाळयांमध्ये काम करावे लागेल.** |

* कनिष्ठ अभियंता (स्था) (क),कनिष्ठ अभियंता (वि) (क) व सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक (क) व प्रभारक (क.) या प्रवर्गात निवड झालेल्या उमेदवारांना कनिष्ठ वेतनश्रेणीत प्रथम नेमणूक देताना शैक्षणिक अर्हतेनुसार आगाऊ वेतनवाढी देण्यात येतील.

९/----

## ४) <u>पर्यवेक्षकीय पदांसाठी इतर अटी व शर्ती</u> :---

**अ)** **वयोमर्यादा** :- दिनांक ०३.०२.२०१७ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेमध्ये ५ वर्षे शिथीलता राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन, उच्च वयोमर्यादा ५ वर्षेपर्यंत शिथीलक्षम राहील. तसेच, प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त/ अपंग प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे. पदवीधारक/ पदविकाधारक अशंकालीन उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे. माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधीक ३ वर्षे इतकी राहील. रा.प.कर्मचा-यांसाठी कमाल वयोमर्यादेची अट नाही.

**ब)** वरील पदापैकी लेखाकार (क.), भांडार पर्यवेक्षक (क.), भांडारपाल (क.), कनिष्ठ अभियंता (स्था.) (क.),कनिष्ठ अभियंता (वि.) (क.),सहा.कार्यशाळा अधिक्षक (क.), प्रभारक (क.) व वरिष्ठ संगणित्र चालक (क.) या पदांसाठी लेखी परिक्षेतील गुणानुक्रमानुसार तसेच सामजिक व समांतर आरक्षणानुसार उमेदवारांच्या निवडयादया कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरण्याच्या अधिन घोषित करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरणा-या उमेदवारांची नावे निवड यादीतून कमी करण्यात येतील.

**क)** सुरक्षा निरीक्षक (क.), सहा.सुरक्षा निरीक्षक (क.) व आगरक्षक (कनिष्ठ) या पदांसाठी लेखी परीक्षेतील गुणानुक्रम तसेच सामाजिक व समांतर आरक्षणानुसार घोषित जागांच्या १:३ या प्रमाणात उमेदवारांना शारिरीक क्षमतेच्या व शारीरीक पात्रतेच्या चाचणीसाठी बोलविण्यात येईल. शारिरीक क्षमतेच्या व शारीरीक पात्रतेच्या चाचणीत पात्र ठरणा-या उमेदवारांची लेखी परिक्षेतील गुणानुक्रमानुसार तसेच सामाजिक व समांतर आरक्षणानुसार उमेदवारांच्या निवड यादया कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरण्याच्या अधिन घोषित करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरणा-या उमेदवारांची नावे निवड यादीतून कमी करण्यात येतील.

**ड)** सहाय्यक वाहतूक अधिक्षक (क) व वाहतूक निरिक्षक (क) या पदासाठी शारिरिक पात्रता विहित असल्याने सदर उमेदवारांच्या लेखी परिक्षेतील गुणानुक्रम तसेच सामाजिक व समांतर आरक्षणानुसार कागदपत्र व शारिरिक पात्रता तपासण्याच्या अधिन निवड यादया घोषित करण्यात येतील. शारिरिक पात्रता तपासणीत व कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरणा-या उमेदवारांची नावे निवड यादीतून कमी करण्यात येतील.

**इ)** लेखी परीक्षेचे स्वरुप वस्तुनिष्ठ राहील.

**ई)** सर्व पदांसाठी मराठी लिहीता - बोलता व वाचता येणे आवश्यक.

**उ)** वरील सर्व अर्हता दिनांक ०३.०२.२०१७ रोजी पूर्ण करणे आवश्यक आहे.

## (५) <u>उमेदवारांची निवड व नेमणूक</u> :---

**अ)** लेखी परीक्षेचे स्वरुप वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी राहील. सदरची परिक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येईल.

१) सर्व पर्यवेक्षकीय पदांकरीता तांत्रिक व अतांत्रिक गटाकरीता २०० गुणांची स्वतंत्र लेखी परीक्षा घेण्यात येईल. परिक्षेचा कालावधी १.३० तास (९० मिनिट) असेल. वरील परिक्षेतील प्रश्नपत्रिका या वस्तूनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील. प्रत्येक प्रश्नांस २ गुण देण्यात येतील.

i) अतांत्रिक गटाकरीता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण असून त्याप्रमाणे एकूण २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल.

ii) तांत्रिक गटाकरीता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान,बौध्दिक चाचणी व पदाशी संबंधित विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ४० गुण असून त्याप्रमाणे एकूण २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल.

१०/----

२) उमेदवाराने एका गटातील एका पेक्षा जास्त पदांसाठी अर्ज केले असल्यास उमेदवाराने लेखी परीक्षेत मिळविलेले गुण इतर उमेदवारांच्या बरोबर त्या-त्या पदांसाठी विचारात घेतले जातील.

३) लेखी परीक्षा उत्तीर्णतेसाठी किमान ३५% गुण आवश्यक. पुरेशे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३०% गुणांपर्यंत शिथिलक्षम.

**ब)** उपरोक्त ४ ('ब', 'क' व 'ड') मध्ये नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांची निवड करण्यात येईल. निवड केलेल्या उमेदवारांना ६ महिन्यांसाठी प्रशिक्षणार्थी म्हणून संबंधित पदाचे नेमणूकपूर्व प्रशिक्षण दिले जाईल.

**क)** ६ महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीपैकी पहिल्या ३ महिन्यांकरिता ज्या पदाकरिता उमेदवारांची निवड झालेली आहे त्या पदाच्या कनिष्ठ वेतनश्रेणीतील किमान मुळ वेतन हे विद्यावेतन म्हणून देय राहील व पुढील ३ महिन्यांकरिता ज्या पदाकरिता उमेदवारांची निवड झालेली आहे त्या पदाच्या कनिष्ठ वेतनश्रेणीतील किमान मुळ वेतन + अनुज्ञेय महागाई भत्ता हे विद्यावेतन म्हणून देय राहील इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत. सदर प्रशिक्षण कालावधीमध्ये क्लासरुम प्रशिक्षणासह प्रत्यक्ष कामाच्या प्रशिक्षणाचा (On the job Training) समावेश असेल.

**ड)** **१.** निवड झालेल्या उमेदवारांची रा.प.महामंडळातील कोणत्याही विभाग / घटकात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा रा.प.महामंडळाच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल.

**२.** सहा.वाहतूक अधिक्षक (कनिष्ठ)/ वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ) व सहा.कार्यशाळा अधिक्षक (कनिष्ठ) आणि प्रभारक (कनिष्ठ) या पदातील निवड झालेल्या उमदेवारांना रा.प.मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून २ वर्षाच्या मुदतीत अवजड वाहन चालन परवाना सादर करणे अनिवार्य राहील.

**इ)** ६ महिन्यांचे नेमणूकपूर्व प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांना पदनिहाय दर्शविण्यात आलेल्या कनिष्ठ वेतनश्रेणीत ३ वर्षांकरीता नेमणूक देण्यात येईल. या कालावधीमध्ये मूळ वेतनासह नियमानुसार अनुज्ञेय असलेले भत्ते मिळतील. प्रथमत: परिविक्षा कालावधी १ वर्षाचा राहील. एक वर्षाचा परिविक्षा कालावधी समाधानकारकपणे पूर्ण केल्यानंतर त्यांना स्थायी करण्यात येईल. उमेदवाराने संबंधीत पदात ३ वर्षे (१ वर्षे परिविक्षा कालावधी धरुन) कनिष्ठ वेतनश्रेणीत समाधानकारक सेवा पूर्ण केल्यानंतर संबंधित पदाच्या नियमित वेतनश्रेणीत सामावून घेण्यात येईल.

**ई)** आवश्यकतेनुसार उमेदवारांनी प्रशिक्षण/ परिविक्षा कालावधी समाधानकारक पूर्ण न केल्यास पुढील नेमणूका नाकारण्याचा रा.प. महामंडळास अधिकार राहील.

**उ)** सहा.वाहतूक अधिक्षक (क.) / सहा.कार्यशाळा अधिक्षक (क.) पदातील सद्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या संभाव्य बढतीमुळे होणा-या रिक्त जागांचा सदर जाहिरातीत समावेश केलेला आहे. त्यामुळे सदर रिक्त जागांमध्ये परिस्थितीनुसार बदल होऊ शकतो. त्यानुसार डिसेंबर २०१८ पर्यंत रिक्त जागा उपलब्ध झाल्यासच निवड यादीतील उमेदवारांना नेमणूक देण्यात येईल. तद्नंतर सदरची निवडयादी व्यपगत होईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**ऊ)** वरिष्ठ संगणित्र चालक (क.) / विभागीय संगणक पर्यवेक्षक (क.) या पदातील भरावयाच्या जागा या महामंडळाच्या नव्याने सुरु करावयाच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी भरावयाच्या असल्याने या जागा प्रकल्प कार्यान्वीत / पुढे सुरु ठेवण्याचा निर्णय झाल्यासच भरावयाच्या असल्याने सदर पदे भरली जातील अन्यथा सदरची निवड यादी व्यपगत होईल व निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देणे शक्य होणार नाही.

११/----

## (६) ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व सूचना :---

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक पासून | दिनांक पर्यंत |
|---|---|---|---|
| १. | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन) चलन प्रिंटसहित करण्याचा कालावधी | दि.१२.०१.१७ | दि.०३.०२.१७ रोजी रात्रौ ११.५९ पर्यंत |
| २. | ऑनलाईन पेमेंट डेबिट कॉर्ड/क्रेडिटकार्ड नेट बँकीगद्वारे स्विकारण्याचा कालावधी | दि.१३.०१.१७ | दि.०३.०२.१७ |
| ३. | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडीया (SBI) यांच्या शाखांमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | दि.१४.०१.१७ | दि.०५.०२.१७ बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत |
| ४. | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दिनांक ०५.०२.२०१७ पर्यंत शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेकडून देण्यात आलेला Transaction ID अर्जामध्ये नमुद करून ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | दि.०६.०२.१७ रोजी रात्रौ ११.५९ पर्यंत | |
| ५. | अर्जामध्ये दुरूस्तीसाठीचा कालावधी, या कालावधीत अर्जामध्ये दुरुस्ती करण्यासाठी उमेदवारास एकदाच संधी देण्यात येईल त्यावेळी उमेदवार अर्जामध्ये दुरूस्ती करू शकतो त्याबाबत सविस्तर सूचना या कालावधीत संकेतस्थळावर उपलब्ध होतील. | दि.०७.०२.१७ | दि.१०.०२.१७ रोजी रात्रौ ११.५९ पर्यंत |

टिप :- अर्ज नोंदणी केल्यानंतर चलनामध्ये नमुद सूचनानुसार बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावे.

**भरती प्रक्रिया शुल्क :** भरावयाच्या पदांचे एकुण १३ प्रवर्ग आहेत. यामधील तांत्रिक गटातील पदांचे सांकेतांक क्र.१३, १४, १५, १६ व १८ असे आहेत. अतांत्रिक गटातील पदांचे सांकेतांक क्र.५, ६, ७, ८, ९, १०, ११ व १२ असे आहेत. तांत्रिक व अतांत्रिक अशा दोन्ही गटांतील पदांसाठी उमेदवार अर्ज करु इच्छित असल्यास प्रत्येक गटासाठी स्वतंत्र अर्ज भरावा लागेल. तसेच एका गटातील एकापेक्षा अधिक पदासाठी अर्ज करु इच्छित असल्यास एकच अर्ज भरावा लागेल. एखाद्या उमेदवारास एकाच गटातील म्हणजे तांत्रिक किंवा अतांत्रिक यापैकी केवळ एकाच गटातील एकापेक्षा जास्त पदांसाठी इच्छूकता दर्शवायची असेल, तर तो अर्जामध्ये प्राधान्यक्रमाद्वारे इच्छूकता दर्शवू शकेल. मात्र प्रत्येक पदासाठीचे स्वतंत्र शुल्क भरावे लागेल. प्रत्येक पदासाठीचे भरती प्रक्रिया शुल्क खुल्या प्रवर्गाकरीता रु.५००/- व मागास प्रवर्गाकरिता रु.२५०/- असे राहील. तसेच बँकेचे सेवा शुल्क (बँक चार्जेस)/ऑनलाईन पेमेंट गेटवे चार्जेस उमेदवाराने स्वत: भरावयाचा आहे.

तांत्रिक गटासाठी एक व अतांत्रिक गटासाठी एक अशी प्रत्येकी २०० गुणांची स्वतंत्र लेखी परीक्षा (ऑनलाईन पध्दतीने) घेण्यात येतील. उमेदवारांनी विशिष्ट गटातील पदांच्या निवडीचा प्राधान्यक्रम अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक राहील. प्राधान्यक्रमानुसार उमेदवाराची गुणानुक्रमानुसार एकाच पदासाठी निवड करण्यात येईल.

## (७) ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत.

१ प्रस्तुत भरतीसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

२ उमेदवारानी वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज www.msrtcexam.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

३ उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/ अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश, माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच, ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना रा.प.महामंडळ जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

४ उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवारांनी त्यांच्या पात्रतेनुसार संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेच, ऑनलाईन अर्ज भरुन सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यावर व सदर अर्ज ग्राहय (Validate) झाल्यानंतर सदर अर्जातील भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना जाहिरात काळजीपूर्वक वाचून अर्ज भरणे आवश्यक आहे. लेखी परीक्षेचा निकाल उमेदवाराने अर्ज ऑनलाईन भरतांना भरलेल्या माहितीवर आधारीत तयार करण्यात येणार असून चूकीची माहिती भरल्यास निकालामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही. अर्ज बिनचूक भरण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील.

उमेदवाराने अर्ज ऑनलाईन भरतांना चूकीची माहिती भरल्यामुळे (उदा.उमेदवाराचे नाव, जात, पुरुष अथवा स्त्री, जन्मतारीख इ. बाबतची माहिती) अर्जदाराची झालेली निवड रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही अर्ज अथवा निवेदन विचारात घेतले जाणार नाही.

५ उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

६ उमेदवारांची लेखी परिक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/ छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन मूळ कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची निवड निश्चित करण्यात येईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यास भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार रा.प.महामंडळाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

७ ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याच्या सविस्तर सूचना www.msrtcexam.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. उमेदवाराने आपला अर्ज www.msrtcexam.in या संकेतस्थळावर भरावा.

## (८) <u>उमेदवारांसाठी ऑनलाईन अर्ज भरणे व शुल्क भरण्याच्या सूचना</u>.

उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता खालील नमूद केलेल्या सूचनांचे पालन करावे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सरळसेवा भरती प्रक्रियेसाठी खाली नमूद केलेले प्रमुख टप्पे आहेत.

१) प्राथमिक माहिती नोंदविणे.
२) मुख्यपृष्ठ
३) प्रोफाईल
४) अर्ज भरा.
    १) वैयक्तिक माहिती
    २) इतर माहिती
    ३) पदे निवडा
    ४) फोटो व स्वाक्षरी
    ५) पुष्टीकरण (Confirm)
    ६) भरणा.
        १) बँक चलन प्रिंट करणे.
        २) स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत शुल्क भरुन (Transaction ID) मिळविणे.

१३/----

नविन नोंदणी करण्यासाठी उमेदवाराने www.msrtcexam.in या संकेतस्थळावर क्लिक करावे. (हे संकेतस्थळ Chrome ५२ आणि वरील किंवा Mozilla Firefox ४७ आणि वरील किंवा Microsoft Internet Explorer ११ आणि वरील श्रेणीमध्ये अनुकूल आहे. आपण Chrome, Mozilla Firefox किंवा Microsoft Internet Explorer याची जूनी आवृत्ती असेल तर आपल्या ब्राऊजर श्रेणीमध्ये सुधारण करणे आवश्यक राहील.

**<u>प्राथमिक माहिती नोंदविणे.</u>**

प्राथमिक माहिती नोंदविण्यासाठी या पृष्ठावर असलेले "नविन नोंदणी करा" हे बटण क्लिक करा. प्राथमिक माहिती नोंदणीच्या पृष्ठावर सर्व माहिती इंग्लिश कॅपिटल लेटर्समध्ये भरा. या पृष्ठावर आपल्याला संपूर्ण नाव, जन्म दिनांक, लिंग, पत्र व्यवहाराचा पूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी इत्यादि माहिती भरावी लागेल. सर्व अनिवार्य माहिती भरल्यानंतर "(Submit)" हे बटण क्लिक करा.

अर्जदाराने नोंद केलेल्या ई-मेल आयडीवर नोंदणी क्रमांक व पासवर्डचा मेसेज लगेचच येईल व आपणाला अर्जदाराच्या मुख्य पृष्ठावर नेले जाईल. प्रथमच लॉगीन केल्यावर अर्जदाराला आपला पासवर्ड नविन बदलण्यासाठी तरतूद केलेली आहे.

सूचना :- अर्जदार एकदा रजिस्टर केलेला ई-मेल आयडी पुन्हा वापरु शकत नाही. तसेच रजिस्टर केल्यानंतर उमेदवार आपला ई-मेल आयडी बदलू शकत नाही.

उमेदवाराने भरणा केल्यानंतर जन्मदिनांक, अर्ज केलेले पद, जात प्रवर्ग याची माहिती बदलू शकत नाही.

**<u>मुख्यपृष्ठ</u>**

पासवर्ड बदलल्यानंतर उमेदवाराला "मुख्यपृष्ठ" दिसेल.

या पृष्ठावर उमेदवाराला पदासाठी अर्ज केल्यानंतर अर्जाचा तपशिल आणि पैसे भरल्यानंतरची स्थिती याची माहिती मिळेल.

**<u>प्रोफाईल</u>**

या पृष्ठावर उमेदवाराला सर्व माहिती भरल्यानंतर त्याची वैयक्तिक आणि इतर माहिती याचा तपशिल मिळेल.

**<u>अर्ज भरा.</u>**

वैयक्तिक माहिती :- या टप्प्यामध्ये उमेदवाराला उर्वरीत वैयक्तिक माहिती भरणे आवश्यक राहील. सर्व अनिवार्य माहिती भरल्यानंतर 'Save (जतन करा.) ' हे बटण क्लिक करा.

इतर माहिती :- या टप्प्यामध्ये उमेदवाराला समांतर आरक्षणाचा प्रकार व परीक्षेसाठी शहर निवडण्याची तरतूद केली आहे. उमेदवाराने नमूद केलेल्या समांतर आरक्षण गटामध्ये मोडत असल्यास योग्य ती माहिती वाचून आपले मत नोंदवावे. सर्व अनिवार्य माहिती भरल्यानंतर 'Save (जतन करा.) ' हे बटण क्लिक करा.

**<u>पदे निवडा</u> :- पद, शैक्षणिक पात्रता आणि व्यावसायिक अर्हता नोंदविणे.**

या टप्प्यासाठी अर्जदाराने अर्ज करावयाचे पद, त्याची शैक्षणिक पात्रता आणि व्यावसायिक अर्हता नोंदवावी.

हा टप्पा सुरु करण्यासाठी अर्जदाराच्या मुख्य पृष्ठावरील "पदे निवड" या लिंकवर क्लिक करावे. पृष्ठावर डाव्या बाजूला पद दिसेल. हे पद निवडल्यावर पृष्ठावर उजव्या बाजूला शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर माहिती भरण्याचे रकाने दिसतील. आपली वयोमर्यादा जर नमूद केलेल्या पदासाठी पात्र नसल्यास आपल्याला तशी माहिती आपल्या पृष्ठावर दाखविण्यात येईल. जर आपण पदासाठी पात्र असल्यास आपणांस आपली संपूर्ण माहिती भरणे आवश्यक राहील व संपूर्ण आवश्यक माहिती भरल्यानंतर 'Save (जतन करा.) ' हे बटण क्लिक करा.

उमेदवाराने एकदा प्रोफाईल भरल्यावर त्याला तांत्रिक आणि अतांत्रिक गटातील एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज करण्याची तरतूद केलेली आहे. जर उमेदवाराने तांत्रिक आणि अतांत्रिक गटातील एकापेक्षा जास्त पदासाठी अर्ज केल्यास त्याला प्राधान्यक्रम नोंदविणे आवश्यक राहील. उमेदवाराने नमूद केलेल्या प्राधान्यक्रमानुसार तांत्रिक किंवा अतांत्रिक गटातील प्रत्येकी एकाच पदासाठी निवड करण्यात येईल.

**<u>फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करणे.</u>**

या टप्प्यासाठी अर्जदाराचा सद्याचा फोटो व स्वाक्षरीची इमेज उपलब्ध असणे आवश्यक आहे.

कार्यपध्दती :-

हा टप्पा सुरु करण्यासाठी अर्जदाराच्या मुख्य पृष्ठावरील "छायाचित्र आणि स्वाक्षरी" या लिंकवर क्लिक करावे.

फोटो व स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी 'ब्राऊज (Browse)' बटण क्लिक करुन इमेज निवडावी. अपलोडचे बटण क्लिक केल्यानंतर फोटो व स्वाक्षरी या पृष्ठावर दिसेल.
(परवानगी फाईल प्रकार :- jpg, jpeg, png) छायाचित्राची साईज ही १ MB पेक्षा जास्त असू नये. तसेच स्वाक्षरीची साईज ही ५१२ KB पेक्षा जास्त असू नये.

**<u>पुष्टीकरण (Confirm)</u>**

या टप्प्यामध्ये आपण नमूद केलेली माहिती पूर्न:तपासणीसाठी तरतूद केलेली आहे. जर आपणांस काही बदल करावयाचा असल्यास आपण मागील टॅबवर क्लिक करुन आवश्यक तो बदल करु शकता. आपण नमूद केलेल्या माहितीची पुष्टी करण्यासाठी "पुष्टी करा (Confirm)" या बटणवर क्लिक करावे. "पुष्टी करा (Confirm)" च्या पृष्ठावरील प्रतिज्ञापत्र वाचून ते वाचले असल्याचा चेक बॉक्स टिक करावा व या पृष्ठावरील "पुष्टी करा (Confirm)" बटणवर क्लिक करावे.

**<u>भरणा</u>**

अर्जा समोरील "भरणा" या दुव्यावर क्लिक करा. तेथे "ऑनलाईन भरणा / चलनाद्वारे भरणा" असे पर्याय दिसतील. चलनाद्वारे भरणा पर्याय निवडल्यास जारी झालेल्या चलनाची प्रिंट घ्या आणि अंतिम तिथीपुर्वी कामकाजाच्या दिवशी एस.बी.आय. च्या शाखेत शुल्क भरणा करा. २४ तासानंतर अर्जासमोरील भरणा स्थिती "भरणा पुर्ण" म्हणून अद्ययावत होईल. उमेदवार ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी "Internate Banking, Credit Card, Debit Card या पर्यायाचा वापर करु शकतो. ऑनलाईन भरणा केल्यास व्यवहार यशस्वी झाल्यावर लगेचच अद्ययावात होईल.

**<u>बँक चलन प्रिंट चलन करणे.</u>**

बँक चलन प्रिंट करण्याआधी "खात्री (Confirm) चा टप्पा पूर्ण करणे आवश्यक राहील. बँक चलन प्रिंट करण्यासाठी अर्जदाराने मुख्य पृष्ठावरील आपण अर्ज केलेल्या पदासमोर जाऊन पैसे भरण्याची पध्दत या कॉलममधील "ऑफलाईन" या लिंकवर क्लिक करावे व आपले बँक चलन A४ कागदावर प्रिंट करावे. अर्जदाराने चलन निर्मितीनंतर २ दिवसानंतर बँकेत फी जमा करावी. (ऑफलाईन पेमेंटसाठी असणारे बँक चार्जेस हे अर्जदारास भरावे लागतील.)

**<u>स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत शुल्क भरुन ट्रांजेक्शन आयडी मिळविणे.</u>**

वर नमूद करण्यात आलेल्या चलन प्रतीचा उपयोग करुन स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये विहित शुल्क / फी चा भरणा करण्यात यावा. चलनावर निर्धारीत केलेल्या जागेवर बँकेकडून ब्रँचकोड व ट्रांजेक्शन आयडी नमूद करुन घ्यावा. शुल्क / फी जमा झाल्याची नोंद महामंडळाकडे आल्यावर आपल्याला शुल्क / फी जमा झाल्याचा SMS व E-mail येईल.

सूचना :- ● ऑफलाईन किंवा ऑनलाईन पैसे भरण्याची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडल्यानंतर उमेदवाराने केलेल्या पदासाठी पुष्टी करण्यात येईल. त्यानंतर पदासाठी भरलेली माहिती बदलू शकत नाही.

● अर्ज फी भरल्यानंतर ती परत दिली जाणार नाही.

● वैयक्तिक माहिती "टॅबमधील नाव, वडीलांचे / पतीचे नाव, अडनाव, जन्मदिनांक, ई-मेल आयडी, जात प्रवर्ग" ही माहिती बदलू शकत नाही. तसेच "इतर माहिती" टॅबमधील प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक, राज्य शासनाचे अंशकालीन कर्मचारी, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू, रा.प.कर्मचारी अशा समांतर आरक्षणा बद्दलची माहिती बदलू शकत नाही.

८ उमेदवाराने भरलेल्या अर्जामध्ये काही दुरुस्ती करावयाची असल्यास (उदा.उमेदवाराचे नाव, जात, पुरुष अथवा स्त्री, जन्मतारीख यासारख्या) उमेदवार संकेतस्थळावर दिनांक ०७.०२.२०१७ ते दिनांक १०.०२.२०१७ या कालावधीत दुरुस्ती करु शकतो. सदर दुरुस्तीची संधी उमेदवारास या कालावधीत फक्त एकदाच देण्यात येणार आहे. याकरीता उमेदवारास वेळोवेळी संकेतस्थळावर तपासणी करणे आवश्यक आहे. याबाबतची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. सदर कालावधी संपल्यानंतर उमेदवारास अर्जामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

९ ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित भरती प्रक्रिया शुल्क भरलेल्या उमेदवाराची स्थिती / परीक्षा प्रवेशपत्र/ वेळापत्रक/ परीक्षा केंद्र/ बैठक क्रमांक इत्यादि बाबतची माहिती तसेच शारीरीक क्षमता चाचणी (Physical Test) तारीख, वेळ व ठिकाण इत्यादिबाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच SMS व E-mail द्वारे सूचित करण्यात येईल. अन्य कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरमान्य वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

१० उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर www.msrtcexam.in या संकेतस्थळावरुन परीक्षेचे प्रवेशपत्र विहित नमूद कालावधीत डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाद्वारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही व प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

१२ उमेदवाराच्या मदत व माहितीकरीता दूरध्वनी क्रमांक **१८००१२२१८४१४** याप्रमाणे आहे. सदरहू दूरध्वनी क्रमांक कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील. अन्य कोणत्याही दूरध्वनी क्रमांकावरुन माहिती दिली जाणार नाही.

१३ उमेदवाराने अर्जासोबत लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

## (९) <u>महत्वाच्या सूचना</u> :---

**१.** i) पर्यवेक्षकीय पदांच्या लेखी परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येतील.

ii) उमेदवारांना लेखी परीक्षा व शारीरीक क्षमता चाचणीची, तारीख, वेळ व ठिकाण इ. बाबतची माहिती एस.एम.एस. अथवा ई-मेलद्वारे कळविण्यात येईल.

iii) लेखी परीक्षा/ शारीरिक क्षमता चाचणी प्रक्रिये दरम्यान उमेदवारास शारीरिक दुखापत झाल्यास किंवा कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस, रा.प.महामंडळ जबाबदार राहणार नाही.

**२.** लेखी परीक्षेतील गुणानुक्रम व सामाजिक तसेच समांतर आरक्षण विचारात घेऊन, निवड झालेल्या उमेदवारांची नावे महामंडळाच्या www.msrtcexam.in या संकेत स्थळावर जाहीर करण्यात येतील.

**३.** संबंधित पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे व शारिरीक पात्रता यांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या केवळ गुणांच्या आधारे उमेदवारांला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय कागदपत्र छाननीच्या अधिन अंतिम निवड केली जाईल.

१६/----

**४.** उमेदवार अर्ज केलेल्या पदासाठीची विहित अर्हता, अटी व शर्ती पूर्ण करीत नसल्याचे आढळून आल्यास त्याचा/ तिचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल.

**५.** उमेदवाराने "जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र" या कार्यालयात नांव नोंदणी केली असली तरी वरील पदांसाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

**६.** निवड झालेले उमेदवार कागदपत्र पडताळणी तसेच शारीरीक पात्रता, शारीरीक क्षमता चाचणीमध्ये अपात्र ठरल्यास त्यांची नावे निवड यादीतून कमी करण्यात येतील.

**७.** शासकीय,निमशासकीय,शासकीय उपक्रम तसेच रा.प.महामंडळाच्या सेवेतील कर्मचा-याने वर नमूद केलेल्या पदांकरीता अर्ज केला असेल, तर सदर कर्मचा-याला खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र (No objection Certificate) अंतीम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक राहील. रा.प.महामंडळातील कर्मचा-याची निवड व नेमणूक झाल्यास त्याचे रा.प.नियमानुसार वेतन संरक्षित करण्यात येईल.

**८)** संबंधित पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणा-या परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती www.msrtcexam.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

**९)** उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी / भरती प्रक्रिया शुल्क भरण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेल्या भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही. तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही.

उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

**१०)** उमेदवारांना लेखी परीक्षा / शारीरीक क्षमता चाचणीसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**११)** परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी (Mobile) अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

**१२)** शासन निर्णय शालेय व क्रिडा विभाग क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रि.युसे-२, दि.३.४.२००५ मधील तरतुदीनुसार राष्ट्रीय व राज्यस्तरावरील अत्यूच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्याची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

**१३)** विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड या प्रवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण त्या - त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास आंतर परिवर्तनीय आहे.

**१४)** अ) इमाव, विमाप्र, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड या मागास प्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या वेळी वैध (Valid) असलेले सादर करणे आवश्यक आहे.

ब) इमाव, भज-क व भज-ड आणि खुल्या गटातील महिलांना ३० टक्के महिला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या तारखेपर्यंत वैध (Valid) असलेले सादर करणे आवश्यक आहे.

१७/----

क) शासन निर्णय क्र.विकाक.२२१५/प्र.क्र.३३७/१६-ब, दिनांक ०४.११.२०१६ नुसार समांतर आरक्षणापैकी भूकंपग्रस्तांसाठी आरक्षित जागेवर उमेदवार उपलब्ध न झाल्यास या जागांसाठी प्रकल्पग्रस्त उमेदवारांचा विचार करण्यात येईल. प्रकल्पग्रस्त उमेदवारही उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या-त्या सामाजिक आरक्षणातील इतर उमेदवारांमधून भरण्यात येतील.

ड) सुशिक्षीत बेरोजगारांना आर्थिक सहाय्य या योजनेतर्गंत शासकीय कार्यालयात काम केलेल्या पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन कर्मचा-यांना शासन सेवा प्रवेशासाठी असलेल्या सूचनांनुसार अंशकालीन उमेदवारांसाठी आरक्षण ठेवण्यात आले आहे. (शासन निर्णय क्र.प्रअंक-१००९/प्र.क्र.२००/ २००९/१६-अ, दिनांक २७.१०.२००९)

इ) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असुन, ते त्या-त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जाती प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांमधून भरण्यात येतील.

**१५)** मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागेवर निवड झालेल्या उमेदवारांना सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक १२ डिसेंबर,२०११ नुसार जात पडताळणीसाठी आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबंधीत उमेदवाराची जबाबदारी राहील.

**१६)** लेखी परीक्षेमधील गुणानुक्रमानुसार निवड झालेल्या उमेदवारांना कागदपत्र तपासणी करतांना शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, अनुभव, समांतर आरक्षणासंबंधीचे दाखले, शासकीय सेवेतील उमेदवारासाठी नियुक्ती प्राधिका-याचे ना हरकत प्रमाणपत्र, अर्ज सादर करण्यात आलेल्या दिवशी वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट), लहान कुटूंब असल्याचे प्रतिज्ञापत्र तसेच मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जात प्रमाणपत्र इत्यादी जे जे उमेदवारास लागू होते त्या दाखल्यांच्या मूळ व स्वयं साक्षांकित प्रतींचे (Self Attested copies) २ संच अंतीम कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**१७)** निवड झालेल्या सर्वच उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईलच असे नाही.

**१८)** जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्यासापेक्ष आहे. निवड झालेल्या उमेदवारांना रा.प.महामंडळाच्या आवश्यकतेनुसार व रिक्त जागांच्या उपलब्धतेनुसार नेमणूका देण्यात येतील. भविष्यात जस-जशा जागा रिक्त होतील त्याप्रमाणे नेमणुका देण्यात येतील. याबाबतचे पूर्ण अधिकार रा.प.महामंडळास राहतील.

**१९)** सदर भरती प्रक्रिया अंशत: वा पूर्णत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार रा.प. महामंडळास राहतील.

**महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)**

महाराष्ट्र नागरी सेवा **(लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन)** नियम, २००५ नुसार

**(नमुना - अ )**

**प्रतिज्ञापत्र**

मी श्री./श्रीमती / कुमारी ------------------------------------------------------------------------ श्री. ---------------------------------------------------------यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय - ------------------- वर्षे, राहणार ---------------------------------------------------------याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी ------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ----------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------- आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक:- सही

**********

## रा.प.महामंडळातील तांत्रिक व अतांत्रिक पर्यवेक्षकीय पदांकरीता सरळसेवा भरतीसाठी लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम

**१) अतांत्रिक गटासाठी एक स्वतंत्र लेखी परीक्षा (ऑनलाईन) घेण्यात येईल. त्याचा तपशिल खालील प्रमाणे राहील. :-**

| अ. क्र. | विषय | एकूण प्रश्न संख्या | एकूण गुण | माध्यम | परिक्षेचा कालावधी | प्रश्न पत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | २५ | ५० | मराठी | ९० मिनिटे ( दीड तास) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न प्रत्येक प्रश्नास २ गुण |
| २ | इंग्रजी | २५ | ५० | इंग्रजी | | |
| ३ | सामान्यज्ञान | २५ | ५० | मराठी | | |
| ४ | बौध्दीक क्षमता चाचणी | २५ | ५० | मराठी | | |
| | **एकूण** | **१००** | **२००** | | | |

**२) तांत्रिक गटासाठी एक स्वतंत्र लेखी परीक्षा (ऑनलाईन) घेण्यात येईल. त्याचा तपशिल खालील प्रमाणे राहील.:-**

| अ. क्र. | विषय | एकूण प्रश्न संख्या | एकूण गुण | माध्यम | परिक्षेचा कालावधी | प्रश्न पत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | २० | ४० | मराठी | ९० मिनिटे ( दीड तास) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न प्रत्येक प्रश्नास २ गुण |
| २ | इंग्रजी | २० | ४० | इंग्रजी | | |
| ३ | सामान्यज्ञान | २० | ४० | मराठी | | |
| ४ | बौध्दीक क्षमता चाचणी | २० | ४० | मराठी | | |
| ५ | पदाशी संबंधित प्रश्न | २० | ४० | मराठी | | |
| | **एकूण** | **१००** | **२००** | | | |

**<u>अभ्यासक्रम</u>**

अ) ज्या पदाकरीता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे, अशा पदांकरीता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापिठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील, तसेच ज्या पदांसाठीची किमान अर्हता पदवीका आहे, अशा पदांकरीता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापिठाच्या पदवीका परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील फक्त मराठी हया विषयाच्या प्रश्न पत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमीक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२) च्या दर्जाच्या समान राहील.

**१) <u>सामान्यज्ञान</u>**

अ) चालू घडामोडी- जागतिक तसेच भारतातील राजकीय, औद्योगिक, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व भौगोलीक क्षेत्रातील चालू घडामोडी.

ब) महाराष्ट्रातील शहरी व ग्रामिण भागातील पायाभूत सुविधांचा विकास (परिवहन, सार्वजनिक/खाजगी वाहतूक व्यवस्था,ऊर्जा, दळणवळण- टीव्ही, इन्टरनेट, पोष्ट दूरसंचार ) इ.बाबतचे ज्ञान

क) भारतीय राज्य घटना तसेच राज्य विधिमंडळाबाबतचे प्राथमिक ज्ञान

ड) महाराष्ट्राचा भूगोल - रचानात्मक विभाग, हवामान पर्जन्यमान, तपमान, नद्या, पर्वत, डोंगर,पूल, नैसर्गिकवने, खनिजे, अक्षांश रेखांश इ.बाबतचे ज्ञान.

इ) सांस्कृतिक - महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे, यात्रा, तीर्थक्षेत्रे, कुंभमेळा, राष्ट्रीय सण मराठी कालगणना इ.बाबतचे ज्ञान

ई) महाराष्ट्रातील अर्थव्यवस्था-आधुनिकीकरण, जागतिकीकरण, अर्थव्यवस्थेसंबंधी प्रश्न जसे मंदी, बेरोजगारी, गरीबी, महागाई दुष्काळ, वाढती लोकसंख्या

उ) संगणक, माहिती व तंत्रज्ञान- आधुनिक समाजातील संगणकाचा वापर, शासकीय / निमशासकीय क्षेत्रातील संगणकीकरण, शासनाचे कार्यक्रम, जसे, ई-गव्हर्नस एक खिडकी योजना,

**२) <u>इंग्रजी-</u>**

अ) उता-यावरील प्रश्न

ब) व्याकरण

**३) <u>मराठी</u>**

ओ) मराठी भाषा - व्याकरणासंबंधी प्रश्न,

४) **<u>बौध्दिकचाचणी</u>**

अ) अंकगणित - दशांश अपूर्णांक, घातांक, वर्गमूळ, टक्केवारी, गुणोत्तर, सरासरी, कामकाळवेग,नफातोटा

ब) बौध्दिक क्षमता चाचणी विषयक प्रश्न.

५) **<u>पदासंबधि प्रश्न</u>**

केवळ तांत्रिक पदांसाठी, संबंधित पदासाठीचे प्रश्न.

*******